जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 MAY 2018
लोकमत

# चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीमला मंजुरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत सुरु असलेल्या बी.ए., बी.कॉम. आणि एम.एस्सी. अभ्यासक्रमांना 'चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम' लागू करण्यास शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापरिषदेची बैठकीत शुक्रवारी मंजुरी देण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद बी. शिंदे यांच्यां अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. यासह विविध विषयांना मंजुरी देण्यात आली. बैठकीस प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते.

बैठकीत परदेशी विद्यार्थ्यांना विद्यापीठात प्रवेश देण्यासाठीची सुधारित नियमावली मान्य करण्यात आली. विद्यापीठामध्ये पी. जी. डिप्लोमा इनं इ-गव्हर्नंस हा अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात आली तसेच विद्यापीठांतर्गत बी. कॉम. आणि एम. कॉम अभ्यासक्रमांतर्गत वस्तू व सेवाकर अर्थात जीएसटीचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा
5 MAY 2018
पुढारी

# पदवीधर अभ्यासक्रमांना सीबीकेएस सिस्टिम लागू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठांतर्गत सुरू असलेल्या बी.ए., बी.कॉम आणि बी.एस्सी. अभ्यासक्रमांना चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टिम (सीबीकेएस) लागू करण्याची मान्यता विद्या परिषदेच्या शुक्रवारी झालेल्या बैठकीत देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे तर सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. या बैठकीत विविध विषयांबाबत निर्णय घेण्यात आले. परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठीची सुधारित नियमावलीला बैठकीत मान्यता देण्यात आली.

**डॉ. भारती पाटील विजयी**

विद्या परिषदेतून व्यवस्थापन परिषदेवर दोन सदस्यांची निवड प्रक्रिया शुक्रवारी झाली. यामध्ये शिक्षक गटातून डॉ. गफुर रसूल कोरबू यांची बिनविरोध निवड झाली. तर महिला गटामध्ये डॉ. भारती पाटील व डॉ. शर्मिला साबळे यांच्यात मतदान प्रक्रिया झाली. यामध्ये २६ मते डॉ. पाटील यांना मिळाल्याने त्या विजयी झाल्या. डॉ. साबळे यांना ८ मते पडली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 MAY 2018
सकाळ

# 'चॉईस बेस्ड क्रेडिट'ला विद्या परिषदेत मान्यता

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठांतर्गत बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. अभ्यासक्रमांना चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम लागू करण्यास विद्या परिषदेत आज मान्यता दिली. त्यासाठी अभ्यासक्रमाची रचना व नियमावलीसही मान्यता दिली.

परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी सुधारित नियमावली मान्य केली. विद्यापीठात पी. जी. डिप्लोमा इन इ गव्हर्नन्स अभ्यासक्रम सुरू करण्याबरोबर विद्यापीठांतर्गत बी. कॉम. व एम. कॉम. अभ्यासक्रमांतर्गत वस्तू व सेवा कराचा (जीएसटी) समावेश करण्यास मान्यता देण्यात आली. या वेळी विद्या परिषदेतून व्यवस्थापन परिषदेवर डॉ. रसूल गफूर कोरबू यांची बिनविरोध निवड झाली. महिला गटातून डॉ. भारती तुकाराम पाटील व्यवस्थापन परिषदेवर निवडून आल्या. त्यांना २६ मते पडली. प्रतिस्पर्धी उमेदवार डॉ. शर्मिला अशोक साबळे यांना ८ मते मिळाली.